MHBU180007682019

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | ३०.०९.२०१९ |
| नोंदणी दिनांक | ३०.०९.२०१९ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०६.०५.२०२६ |
| कालावधी | ०६ व. ०७ म. ०६ दि. |

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, संग्रामपुर यांच्या न्यायालयात**<br>**(पीठासीन अधिकारी– एस. एल. रामटेके)**<br>(घोषीत दिनांक ०६.०५.२०२६)<br>**नियमित फौजदरी खटला क्रं. ७०/२०१९, निशाणी क्रं. ३६**<br>**गु.र.नं. १३०/२०१८ पोलीस ठाणे तामगांव, बुलडाणा.** |
| फिर्यादी | सरकार |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | डॉ. एफ. ए. अहमद |
| आरोपी | सचिन देविदास वानखडे,<br>वय – २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,<br>रा. शेवगा खुर्द, ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. बी. पी. खंडेराव |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०९.०७.२०१८ |
| पहिली खबर दिनांक | १०.०७.२०१८ |
| दोषारोपत्राचा दिनांक | ३०.०९.२०१९ |

| | |
|---|---|
| दोषारोपत्र ठेवल्याचा दिनांक | १६.०२.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६.०५.२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशील**

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | दिलेली शिक्षा. | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन देविदास वानखडे | १०.०७.२०१८ | ११.०७.२०१८ | ३५४–अ, ३५४–ड, ४५२, ५०६ भा.दं.वि., १८६०. | निर्दोष मुक्त केले. | – | निरंक |

**भाग–क**

## अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार

### अ. अभियोग

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | शालिनी गजानन पिवतकर | फिर्यादी |

### ब. बचाव साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

### क. कोर्ट साक्षीदार, इतर

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी

### अ. अभियोग

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | २५ | लेखी फिर्याद |
| २ | २६ | प्रथम खबर अहवाल |

| | | |
|---|---|---|
| ३ | २७ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | १८ | दोषारोप |

**ड. मुद्देमाल**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | -- | निरंक |

## **– न्यायनिर्णय –**

(घोषणा दिनांक – ०६.०५.२०२६)

आरोपीविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड संहिता कलम ३५४–अ, ३५४–ड, ४५२, ५०६ अन्वये दोषारोप सिध्दतेकरीता चालविण्यात आला.

२. **अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की,**

दिनांक ०९/०७/२०१८ रोजी १४.३० वाजताचे सुमारास फिर्यादी ह्या घरी एकटया हजर असतांना फिर्यादी यांचे घराशेजारी राहणारे आरोपी फिर्यादी ही घरामध्ये एकटी हजर असल्याचा फायदा घेवून तिचे घरामध्ये प्रवेश करुन फिर्यादीला म्हणाला की, तु मला आवडते माझ्या सोबत तु प्रेम कर व शरीर सुखाची मागणी केली. आरोपीस फिर्यादीने विरोध केला असता तु जर माझ्यासोबत प्रेम केले नाही तर मी तुझी गावामध्ये बदनामी करेल व

तुझ्या पतीला सांगेल असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलिस स्टेशनला फिर्याद दिली.

**३.** दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुद्ध गु.रं.क्र. १३०/२०१८ वरील कलमांप्रमाणे नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास रामकिसन भिकाजी माळी यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. तपासाअंती आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेचे कलम ३५४–अ, ३५४–ड, ४५२, ५०६ प्रमाणे दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** आरोपीविरुद्ध नि.क्र. १८ खाली वर नमुद कलमाप्रमाणे आरोप निश्चित करुन आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले. आरोपीने गुन्हा केल्याचे नाकारले व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** उभयपक्षांनी प्रकरणाचा निकाल गुणाअवगुणावर करण्याची विनंती केली आहे. अभिलेखावरील पुरावा व उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकुण खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात व त्यावरील माझे निष्कर्ष मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, दिनांक ०९/०७/२०१८ रोजी दुपारी ०२.०० ते ०२.३० वाजताचे सुमारास शेवगा खु., ता. संग्रामपुर, जि. बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीचे घरात गृहअतिक्रमण केले व त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ४५२ अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे घरात येवून तिला तु मला आवडते तु माझेशी प्रेम कर असे म्हणून तिचा विनयभंग केला व | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३५४–अ अन्वये गुन्हा केला आहे ? | |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करण्याच्या उद्येशाने आरोपीचे मोबाईलवरुन तिला माझा काही अधिकार नाही का, प्रेम करते पण प्रेम करु शकत नाही असे एस.एम.एस. केले व घरात येवून तिला तु मला आवडते तु माझेशी प्रेम कर असे म्हटले व त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३५४–ड अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ४. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये गुन्हा केला आहे ? | नाही. |
| ५. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

**मुद्दे क्र.१ ते ४ बाबत–**

६. सदरचे मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्यासाठी ते एकत्र चर्चेसाठी घेण्यात आले आहेत.

७. सरकार पक्षाने फिर्यादी /स.सा.क्र.१ शालिनी गजानन पिवतकर यांची साक्ष नि.क्र. २४ वर नोंदवलेली आहे. दोन्ही पक्षांनी नि.क्र. २३ वर त्यांच्यामध्ये झालेली तडजोड पुरसीस सादर केली आहे. आरोपीतर्फे घटनास्थळ पंचनामा मान्य करण्यात आला आहे.

आरोपीविरोधात कोणताही पुरावा आला नसल्याने फौजदारी प्रक्रीया संहिता (फौ.प्र.सं.) चे कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदवण्यात आलेली नाही.

८. शालिनी गजानन पिवतकर (अ.सा.क्र.१) यांनी सरतपासात कथन केले की, त्या आरोपीस ओळखतात. तो त्यांच्या घरासमोर राहतो. दिनांक ०९.०७.२०१८ रोजी काय घटना घडली हे त्यांना आठवत नसल्याचे कथन केले आहे. त्यांनी पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती. परंतु, त्यातील मजकुर तिला माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्याने सरकारी वकीलांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारुन देखिल अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल असा पुरावा अभिलेखावर आला नाही.

९. ज्याअर्थी फिर्यादी साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने इतर साक्षीदारांना तपासुन देखील अभियोग पक्ष प्रस्तुतचा गुन्हा आरोपीविरोधात शाबित करु शकणार नाही. या कामी फिर्यादी साक्षीदार हे महत्त्वाचे साक्षीदार असल्याने त्यांच्या साक्षीवरच अभियोग पक्षाची भिस्त अवलंबून आहे. फिर्यादी शालिनी गजानन पिवतकर (अ सा.क्र.१) यांनी त्या आरोपीस ओळखतात. तो त्यांच्या घरासमोर राहतो. दिनांक ०९.०७.२०१८ रोजी काय घटना घडली हे त्यांना आठवत नसल्याचे कथन केले आहे. त्याने पोलिस स्टेशनला तक्रार दिली होती, परंतु, त्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे सांगितले. सबब, त्यांची साक्ष अभियोग पक्षास कोणत्याही प्रकारे उपयुक्त ठरत नाही. सदरचा कागदोपत्री पुरावा हा निव्वळ फिर्यादीच्या जबाबाला दुजोरा देणारा असतो. तसेच सदर साक्षीदाराने त्यांच्यात व आरोपींमध्ये कोर्टाबाहेर तडजोड झाली असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादी व्यतिरिक्त सरकार पक्षातर्फे इतर साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. फिर्यादीने सरकार पक्षास साथ दिली नसल्याने इतर साक्षीदार तपासूनही आरोपीविरोधातील कोणताही गुन्हा संशयापलीकडे शाबीत होऊ शकत नाही. अभिलेखावरील एकंदरीत पुरावा लक्षात घेता आरोपीविरोधात शाश्वत शंकेपलीकडे कोणताही गुन्हा शाबीत होत नाही. सबब, मुद्दे क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. मुद्दा

क्र. ५ साठी मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे:

# **आदेश**

**१.** आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३५४–अ, ३५४–ड, ४५२, ५०६ अन्वये दंडनीय अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात येत आहे)

SWAPNIL LILADHAR RAMTEKE

Digitally signed by SWAPNIL LILADHAR RAMTEKE
Date: 2026.05.06 17:52:28 +0530

**(श्री. स्वप्निल लि. रामटेके)**

दिनांक:– ०६.०५.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संग्रामपुर

सरकार वि. सचिन
नि.फौ.ख.क्र. ७०/२०१९
MHBU180007682019

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पीडीएफ फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस. जी. जैन

कार्यालयाचे नाव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, संग्रामपुर

लघुलेखक